उदा.- देवळेरावळे, थाटंमाटं, उष्टंमाष्टं, न्हाऊमाखू, जेऊखाऊ, कामकाज, मुलंबाळं, जाडंभरडं, खायलाप्यायला, चोळीपोळी, लेकीसुना, दागदागिने, दहीभात, घरदार, गुरंढोरं, कोडकौतुक, काटेकुटे, उरलंसुरलं, शेतीभाती, नवराबायको, फाटकंतुटकं, वाजतगाजत इत्यादी.

थोडक्यात कहाण्यांची भाषाशैली ही आकर्षक, अर्थपूर्ण, रसाळ, वेधक आणि मनाला मोहून टाकणारी अशी आहे, असे वाटते.

कहाण्यांची भाषाशैली कशी असते, हे आपण पाहिले. आता कहाण्यांची मांडणी कशी असते ते पाहू.

**ब) कहाण्यांची मांडणी :-**

प्राचीन काळापासून कथा, कहाणी या गोष्टी मानवी जीवनप्रवाहाबरोबरच चालत आलेल्या आहेत. कहाणी आपल्यासमोर येते ती मुळी एका आटपाट नगरीकडे घेऊन जाण्यासाठीच! एक आटपाट नगर होतं, असे कहाणीने म्हणायचाच अवकाश की श्रोता आणि वाचक मनाने त्या

कल्पित नगरीत दाखल होतात. माणसाचे मन हे, खरेतर निसर्गत:च कल्पिताचे भुकेले असते. जे स्वत:जवळ आहे आणि स्वत: जाणलेले आहे, त्यापेक्षा जे दूर आहे आणि अज्ञात आहे; त्याच्याकडे जाण्यासाठी ते उत्सुकलेले असते. कहाणी माणसाचे हे मन जाणते. या मनासाठीच कुण्या अनामिक प्रतिभावंताने कोणे एके काळी ही आटपाट नगरी उभी केली.

साधारणत: कहाणीतील कथानकाच्या मांडणीसाठी आरंभ, मध्य आणि शेवट या तीन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असून कथेच्या रचनातंत्रात याच तीन गोष्टींचा प्रामुख्याने समावेश होतो. चांगल्या कथेत या तिन्ही गोष्टींचे समुचित असे सामंजस्य प्रस्थापित झालेले असते.

कथा कशी लिहावी याबाबत कथेच्या अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. त्यापैकी ज्येष्ठ लेखक ना. सी. फडके यांनी म्हटले आहे – 'कथेला आकर्षक सुरुवात हवी. गुंतीगुंतीचा मध्य हवा आणि या गुंतागुंतीची उकल शेवट व्हायला हवी.' [१४]

आता आपण 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील कहाण्यांची मांडणी कशी आहे ते पाहू.

१) आरंभ २) मध्य ३) शेवट या कहाणीच्या रचनेपैकी आता कहाणीचा आरंभ कसा आहे ते पाहू.

**१) कहाणीचा आरंभ :-**

कथेचा आरंभ अनेक प्रकारांनी करता येतो. त्याप्रमाणे 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकात कहाणीचा आरंभ तीन प्रकारे केला आहे.

अ) देवतेच्या नावाने आरंभ :-

काही कहाण्यांचा आरंभ ज्या देवतेसंदर्भात ती कहाणी असेल त्या देवतेचे नाव घेऊन केला आहे. जणू काही त्या देवतेलाच उद्देशून या कहाण्या सांगितल्या आहेत असे वाटते. याची काही उदाहरणे पाहू.

ऐका परमेश्वरा गणेशा, तुमची कहाणी. ऐका गोपद्मांनो, तुमची कहाणी. ऐका पांची देवांनो, तुमची कहाणी. ऐका परमेश्वरा, धरित्रीमाये, तुमची कहाणी. ऐका दीपकांनो, तुमची कहाणी.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ऐका आदित्यराणूबाई, तुमची कहाणी. ऐका परमेश्वरा सोमवारा, तुमची कहाणी. ऐका महादेवा, तुमची कहाणी. ऐका नागोबा देवा, तुमची कहाणी. ऐका बुधबृहस्पतींनो, तुमची कहाणी. ऐका शुक्रवारा, तुमची कहाणी. ऐका परमेश्वरा, शनिदेवा, तुमची कहाणी. ऐका ऋषीश्वरांनो, तुमची कहाणी. ऐका परमेश्वरा महाविष्णु, तुमची कहाणी. ऐका देवी संतोषीमाते, तुझी कहाणी. ऐक माते वैभवलक्ष्मी, तुझी कहाणी. ऐक देवी सावित्री, तुझी कहाणी.

थोडक्यात काही कहाण्यांची सुरुवात 'ऐका परमेश्वरा, -------, तुमची कहाणी' अशी आढळते. यात रिकाम्या जागी त्या त्या देवाचे किंवा वाराचे नाव आले आहे. आता, दुसऱ्या प्रकारच्या आरंभाची उदाहरणे पाहू.

ब) आटपाट नगराने आरंभ :-

काही कहाण्यांच्या सुरुवातीला 'आटपाट नगर होतं. तिथं एक------होता' ही वाक्ये येतात. रिकाम्या जागी राजा, ब्राह्मण, शेतकरी, म्हातारी अशी सामान्यनामे येतात. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे - आटपाट नगर होतं, तिथं एक ब्राह्मण होता. आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता. आटपाट नगर होतं, तिथं एक शेतकरी होता. आटपाट नगर होतं, तिथं एक गरीब ब्राह्मण होता. आटपाट नगर होतं, तिथं एक वाणी होता. आटपाट नगर होतं, तिथं एक कुणब्याची म्हातारी होती. आटपाट नगर होतं, त्या नगरात एक महादेवाचं देऊळ होतं. अशा प्रकारे काही कहाण्यांची सुरुवात झालेली आढळते. आता एका तिसऱ्या प्रकारच्या कहाणीच्या आरंभाचे उदाहरण पाहू.

क) अन्य प्रकारे आरंभ :-

'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील हरितालिकेच्या कहाणीचा आरंभ एका तिसऱ्याच प्रकारे कलात्मकरीतीने झाला आहे. तो पुढीलप्रमाणे -

उदा. - एके दिवशी ईश्वरपार्वती कैलासपर्वतावर बसली होती.

थोडक्यात अशा प्रकारे कहाणीचा आरंभ वेगवेगळ्या प्रकारे करता येतो. ते आपण पाहिले. आता 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' यातील कहाण्यांचा मध्य कसा आहे ते समजावून घेऊ.

२) कहाणीचा मध्य :-

कहाणीचा आरंभ ही गोष्ट जितकी महत्त्वाची तितकाच कथेचा 'मध्य'ही महत्त्वाचा असतो. कारण, कहाणीच्या मुख्य घटनेचा परिवर्तन बिंदू हा कथेच्या मध्यावरच असतो. दुसरी गोष्ट कहाणीच्या संघर्षाचे, समस्यांचे स्पष्ट स्वरूप 'मध्या'वरच ठळकपणे प्रकाशित झालेले असते. 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील काही कहाण्यांतील मध्यवर्ती समस्या, संघर्ष, गुंतागुंत कशी आहे ते पाहू.

उदा.- गोपद्मांच्या कहाणीत, स्वर्गातल्या सभेत अचानक तंबोऱ्याच्या तारा तुटतात, मृदुंगाच्या भेऱ्या फुटतात आणि सभेतून असा हुकूम येतो की, गावात कोणी वाणवशावाचून असेल, त्याच्या पाठीचा तीन बोटे कंकर काढून, तंबोऱ्याला तारा लावल्या जाव्यात. हे ऐकून कृष्णदेव घाबरतात. कारण, त्यांची बहीण सुभद्रा ही वाणवशाशिवाय असते. ते लगेचच तिला वाणवसा करायला सांगतात. त्याप्रमाणे ती वाणवसा करते आणि तिच्यावरचे संकट टळते. [१५] प्रस्तुत कहाणीत सुभद्रा वाणवशाशिवाय आहे हे समजल्यानंतर दूत तिकडे जाऊन पाहतात, तर तिने वसा वसलेला आढळतो. जर तिने वसा वसला नसता, तर तिच्या पाठीचा तीन बोटे कंकर काढून तंबोऱ्याच्या तारा जोडल्या असत्या, मृदुंगाच्या भेऱ्या वाजत्या केल्या असत्या.

हाच या कहाणीचा मध्यवर्ती केंद्रबिंदू आहे. हीच या कहाणीतील समस्या आहे.

२) दिव्यांच्या अवसेच्या कहाणीत, राजाची सून एक दिवस घरातील पदार्थ स्वत: खाते आणि त्याचा आळ उंदरांवरती घेते. मग उंदीर तिचा सूड घेण्याच्या उद्देशाने तिची चोळी रात्रीच्या वेळी पाहुण्यांच्या अंथरूणात नेऊन टाकतात. दुसऱ्या दिवशी तिची निंदानालस्ती होते आणि तिला घराबाहेर हाकलून दिले जाते. तिच्या माघारी घरातील दिव्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होते. एक दिवस गावातील सर्व दिवे अदृश्य रूप धारण करून, एका झाडावर गप्पागोष्टी करीत असतात. त्यावेळी राजाचा घरचा दिवा सून व उंदीर यांच्यात घडलेला प्रकार सांगतो आणि राजा ते ऐकतो. [१६] या कहाणीत राजाच्या सुनेला करावा लागणारा संघर्ष आणि दिव्याची हलाखीची परिस्थिती हा कहाणीचा केंद्रबिंदू आहे असे वाटते.

३) वर्णसटीच्या कहाणीत, ब्राह्मणाची सातवी मुलगी म्हणते, 'मी माझ्या नशिबाची आहे'. त्यामुळे ब्राह्मण तिचे लग्न एका कुष्ठरोगी भिकारड्याशी लावून देतो. थोड्याच दिवसांनी तो मरतो. तेव्हा नवऱ्याचे प्रेत मांडीवर घेऊन, ती स्मशानात रडत बसते. नंतर, शिवपार्वतीच्या सांगण्याप्रमाणे ती मावशीकडून वर्णसटीचे पुण्य घेऊन येते. आणि तिचा नवरा जिवंत होतो. [१७] या कहाणीत मुलीला हालअपेष्टा, दु:ख सहन करावे लागते. संघर्ष करावा लागतो. तरीही ती नवऱ्याचे प्राण परत आणते. खंबीरपणे, स्वाभिमानाने जीवन जगते. हा या कहाणीचा मध्य आहे असे म्हणावेसे वाटते.

थोडक्यात वरील सर्व कहाण्यांतील उदाहरणांचा आपण मध्य पाहिला. त्यामध्ये आपणाला सगळीकडे एक प्रकारची समस्या, संघर्ष, गुंतागुंत यांचे दर्शन घडते.

कहाणीचा मध्य कसा असतो, हे समजावून घेतल्यानंतर आता आपण कहाणीचा शेवट कसा असतो ते पाहू.

**३) कहाणीचा शेवट :-**

कहाणीच्या पूर्णतेची अंतिम अवस्था म्हणजे कहाणीचा शेवट असतो. कहाणीत असणारा सर्व विस्तार 'शेवटात' एकत्रित झालेला असतो. हा कहाणीचा अंतिम 'शेवटात' एकत्रित झालेला असतो. हा कहाणीचा अंतिम केंद्रीभूत क्षण असतो. म्हणून कहाणीचा शेवट करणे ही गोष्ट अतिशय महत्त्वाची असते. कहाणीचा शेवट हा व्रत करणाऱ्या व्यक्तींवर किंवा कहाणी ऐकणाऱ्या व्यक्तींवर संपूर्ण ताबा मिळविणारा असा क्षण असतो. या क्षणीच कहाणी ऐकून श्रोता पूर्ण प्रभावित झालेला असतो. यावेळीच त्याच्या सर्व जिज्ञासा तृप्त होऊन कहाणीचा अंतिम परिणाम त्याच्यावर अंमल गाजवीत असतो.

कहाणीतील विषयाने, भक्तांच्या रसिक वाचकांच्या मनात त्यासंबंधी संवेदनेचे एक वलय निर्माण केले पाहिजे आणि त्या वेधक वलयाचा लय म्हणजेच कथेचा शेवट असावा असे वाटते. 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहातील' प्रत्येक कहाणीचा शेवट हा सुखांतच आहे. या कहाण्यांना शोकांतिका नाही. भारतीय साहित्यशास्त्रात शोकांतिका नाही. शोकांतिकेची कल्पना

पाश्चात्य साहित्यातून आपल्याकडे आली आहे. त्यामुळे सर्व कहाण्यांचा शेवट गोड आणि सुखांतच आहे.

आता 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहातील' कहाण्यांचा शेवट कसा असतो, याची चर्चा करू.

या कहाण्यांत शेवटच्या वाक्यापूर्वी '-------------यांना जसा----------- प्रसन्न झाला तसा तुम्हा आम्हा होवो. 'किंवा 'जसा त्यांना ----------पावला तसा तुम्हा आम्हा पावो.' किंवा 'ती सुखानं नांदू लागली, तसं तुम्ही आम्ही नांदू.' किंवा 'सर्वांना आनंद झाला, तसा तुम्हा आम्हा होवो.' अशी आशीर्वाद देणारी, आशावाद निर्माण करणारी, विध्यर्थ आख्यातरूपी, क्रियापदयुक्त वाक्ये येतात. अशा वाक्यांमुळे सामान्यांना जगायला आधार मिळतो. वरील वाक्यांतील रिकाम्या जागी संबंधित देवाचे नाव येते. अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :-

उदा.- १) 'ब्राह्मणाच्या सुनेला जसा नागोबा प्रसन्न झाला, तसा तुम्हा आम्हां होवो.' [१८]

२) 'लेकीसुनांना घेऊन म्हातारी सुखाने नांदू लागली ,तसं तुम्ही आम्ही नांदू.'[१९]

३) 'जसा ब्राह्मण पतीपत्नींना शंकर पावला, तसा तुम्हां आम्हां पावो.' [२०]

कहाणीच्या मध्यात जो संघर्ष, समस्या आहे ती शेवटी संपते. त्यातील गुंतागुंत सुटते आणि दु:ख दूर होते. शेवटी सगळेच आनंदात राहतात. ज्याचा शेवट गोड ते सर्व काही गोड असे म्हणतात, त्याचा प्रत्यय या कहाण्यांतून येतो. अशी काही कहाण्यांतील उदाहरणे पाहू.

उदा.- १) राजाची नावडती सून वसा घेते, पूजा करते, मनोभावे व्रत करते. त्यामुळे तिला शंकर प्रसन्न होतो आणि तिची संकटे दूर होतात. व्रताच्या पुण्याईने ती नावडतीची सर्वांची आवडती होते. [२१]

२) एक गरीब ब्राह्मण बाई शुक्रवारचे जिवत्यांचे व्रत मनापासून अखंडपणे करते त्यामुळे तिचे मूल तिला सुखरूप परत मिळते. जिवती तिला प्रसन्न होते आणि ती सुखासमाधानाने राहते. [२२]

३) राजाची धाकटी सून बुध - बृहस्पतीचे व्रत नेमधर्माने भक्तिभावाने करते, त्यामुळे तिला बुध - बृहस्पती प्रसन्न होतात आणि तिला संतती, संपत्ती मिळून सुखाचे दिवस येतात. [२३]

याशिवाय प्रत्येक कहाणीचा शेवट हा 'ही साठां उत्तरांची कहाणी, पांचा उत्तरी देवाब्राह्मणाचे द्वारी, पिंपळाच्या पारी, गाईचे गोठी सुफळ संपूर्ण' या वाक्याने होतो.

थोडक्यात या सर्व कहाण्यांना आकर्षक अशी सुरूवात आहे. कहाण्यांच्या मध्यभागी सर्वत्र समस्या, संघर्ष आणि गुंतागुंत आढळते आणि शेवट हा सुखकर, आनंदमय असा गोडच आढळतो. कहाण्यांची मांडणी आपण पाहिली. त्यातील आरंभ, मध्य, शेवट कसा असतो ते समजावून घेतले. आता कहाण्यातील संवाद कसे असतात ते पाहू.

क) कहाण्यातील संवाद :-

अनेक साहित्य प्रकारांमध्ये संवादांना अतिशय महत्त्व असते. मग, ती कथा असो वा कादंबरी. नाटक हे तर संवादशिल्पच आहे. संवाद पात्राचे व्यक्तिमत्त्व उभे करतात, कथानक पुढे नेतात. स्त्रियांच्या कहाण्यांच्या संदर्भात सांगायचे झाले तर, कहाण्यांतील संवाद नाट्यपूर्ण आणि नादमय आढळतात. साध्या, सोप्या बोलीभाषेत संवाद कहाण्यांत आढळून येतात. त्यात गद्याचा रूक्षपणा कुठेच जाणवत नाही. सुटसुटीत छोट्या छोट्या वाक्यरचनेतून कहाणी सांगणारी आणि कहाणी ऐकणारी व्यक्ती यांची भावमय मनोभूमिका प्रकट होत असते. त्यामधील संवादांची भाषा बोजड नाही. कहाणीतील व्यक्ती सहजपणे एखादे वाक्य बोलून जाते. संसारी, अडाणी स्त्रियांना समजेल असे कहाणीतील संभाषण असते.

उदा.- 'काय, ग बायांनो, कसला वसा वसता ? तो मला सांगा, तुला रे वसा कशाला हवा ? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील. उतत नाही, मातत नाही, घेतला वसा टाकीत नाही.' [२४]

छोट्या छोट्या वाक्यरचनेमुळे व्रतकथेत निर्माण होणारी गेयता फारशी खंडित होऊ नये म्हणूनच बहुधा व्रतकथेत सलग संवाद आढळतात. एका व्यक्तीचे बोलणे संपले की लगेच दुसऱ्याचे बोलणे सुरू होते. अमुक एक म्हणाला किंवा म्हणाली असे शद्बप्रयोग कहाणीत वारंवार येत नाहीत. हे संवाद सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तरात्मक असतात. 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहा'मधील काही उदाहरणे पाहू.

उदा.– १) 'पलंगाखाली उजेड दिसला. हा उजेड कशाचा ? ताटी भरल्या रत्नांचा. ही रत्ने कोठून आणली? माझ्या माहेरच्यांनी दिली. तुझे माहेर कोठे आहे? वेळूच्या बेटी आहे.' [२५]

२) 'संपत शनिवारी आपला एक मुलगा आला. बाई, बाई, मला न्हाऊ घाल, माखू घाल. बाबा, घरामध्ये तेल नाही. तुला न्हाऊ कशानं घालू? माझ्यापुरतं घागरीत असेल. थोडं शेंडीला लावून न्हाऊ घाल. जेवू घाल.'[२६].

३) भल्या ब्राह्मणा, जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, माळी ब्राह्मणा, चरणी तू चालतोस, मुखी तर वदतोस, एवढं तप कोणाकारणे करतोस? महाविष्णु भेटावा याकारणे करतो. महाविष्णु तो मीच. कशानं भेटावा? कशानं ओळखावा? असाच भेटेन, असाच ओळखेन.' [२७]

स्त्रियांच्या या कहाण्यांचे एक वेगळेपणा म्हणजे व्यक्ती तर बोलतातच, पण त्याबरोबर प्राणीही एकमेकांशी बोलताना आढळतात. निर्जीव वस्तूही कौशल्यपूर्ण संभाषण करताना आढळून येतात. त्यांच्यातील संवादातून राग, प्रेम, द्वेष, सहानुभूती, सूडभावना या माणसांप्रमाणेच व्यक्त होताना दिसतात. याची काही उदाहरणे पाहू.

उदा. १) दिव्यांच्या अवसेच्या कहाणीत, राजाच्या घरचा दिवा सांगू लागतो, 'बाबांनो, यंदा माझ्यासारखा हतभागी कोणी नाही. मी दरवर्षी सर्व दिव्यांत मुख्य असायचो. माझा थाटमाट जास्त व्हायचा. पण, यंदा मला विपत्तीत दिवस काढावे लागत आहेत.' [२८]

या कहाणीत सगळे दिवे आपआपसांत बोलत आहेत. त्यामध्ये राजाच्या घरचा दिवाही आपली व्यथा सांगतो, म्हणजे दिवा बोलतो हे आपणास दिसून येते.

२) नागपंचमीच्या कहाणीत, नागाची पिल्ले एक दिवस आपल्या आईला विचारतात, 'आमची शेपटं कशानं तुटली?' तेव्हा नागीण पिल्लांना मुलीच्या हातून घडलेला प्रकार सांगते.[२९]

वरील कहाणीत नागाची पिल्ले व नागीण यांच्यातील संभाषण सामान्य माणसांच्या संवादासारखेच आले आहे.

३) ऋषिपंचमीच्या कहाणीत, बैल व कुत्रा या प्राण्यांच्यातील संवाद आला आहे. कुत्री बैलाला सांगते, 'मी आज उपाशी आहे. खिरीच्या पातेल्यात सापाने गरळ टाकलेली मी पाहिली. ते

अन्न खाऊन, ब्राह्मण मरतील म्हणून मी पातेल्याला तोंड लावले. म्हणून सुनेने जळते कोलीत घेऊन माझी कंबर मोडली.' नंतर बैल म्हणतो, 'तू आदल्या जन्मी विटाळ घरात कालविल्यामुळे मला त्याचा संपर्क झाला. त्याच्या दोषानं मी बैल झालो. आज मुलानं मला नांगराला धरलं, तोंड बांधून मारलं. मी देखील आज उपाशीच आहे. त्याचं श्राद्ध फुकट गेलं.'[३०]

प्रस्तुत कहाणीत बैल व कुत्री हे भिन्न जातीतील प्राणी असून, त्यांची भाषा एकमेकांना समजते, याचे आश्चर्य वाटते. असा त्यांच्यातील संवाद अगदी मोजक्या शद्वांत आढळून येतो.

थोडक्यात स्त्रियांच्या या कहाण्यात राजा, राणी, ब्राह्मण, त्याची बायको, प्रधान, गुरव, शेतकरी, नाग, नागीण, बैल व कुत्री, दिवा इत्यादी पात्रे येतात. त्यांच्या संवादांमधून त्या-त्या प्रसंगाचे चित्र डोळ्यासमोर उभे करण्याचे कहाण्यांचे कौशल्य आढळून येते. संवाद अतिशय खटकेबाज, मोजक्या पण अर्थपूर्ण शद्वांत आढळतात. कहाण्यांतील संभाषण व्यक्तीच्या मनावर ठसविण्याचे सामर्थ्य संवादातील शद्वांत असल्याचे आढळते. 'अल्पाक्षरत्वं रमणीयं'हा साहित्याचा गुण संवादातून आढळून येतो.

स्त्रियांच्या कहाण्यांतील संवाद हा महत्त्वाचा घटक आहे हे आपण पाहिले. आता स्त्रियांच्या कहाण्यांची कथनशैली कशी असते ते पाहू.

**ड) कहाण्यांची कथनशैली :-**

प्राचीन काळापासून पिढ्यान्‌पिढ्या मौखिक परंपरेने कहाणी सांगितली जाते. पूर्वीच्या काळी छपाई यंत्राचा शोध लागला नव्हता. त्यामुळे वेद, काही महानुभाव साहित्य, संत रचना, पंडितांच्या कविता, शाहिरांच्या लावण्या व पोवाडे हे बहुतांश सर्व साहित्य पद्यात होते. त्यामुळे ते पाठ करणे सोईस्कर आणि सोपे होते. ग्रंथाची प्रत बऱ्याचदा हातानेच नक्कल करत असत. कहाणीच्या हस्तलिखित मूळ पोथ्या कालांतराने उपलब्ध होऊ शकत नव्हत्या.

कहाण्यांचा जन्मकाळ निश्चित माहीत नसल्याने, त्या प्राचीन काळातील आहेत, असे मानले जाते. या कहाण्या विशिष्ट सणाला किंवा ज्या त्या वाराच्या व्रतादिवशी एखादी स्त्री सांगत

असे व इतर स्त्रिया मनोभावे ती कहाणी ऐकत असत. या कहाण्या गद्यपद्यमिश्रीत असल्यामुळे त्यांना एक प्रकारची लय, ताल आणि नादमयता असल्याचे आढळते. कहाणी म्हणजे जणूकाही एक प्रकारचे काव्यात्मक गद्यच आहे, असे वाटते. कहाण्यांची कथनशैली गीतमय आहे. काही कहाण्यांमध्ये यमक आढळते. काही ठिकाणी प्रास साधलेले दिसून येते.

उदा. – 'चारी सोमवारी हाक ऐकली. जेवती ताटं ढकलून दिली रत्नांनी भरलेली सोन्याची झाली. ती मला देवांनी दिली.' [३१]

कहाण्यांचे कथन छोट्या-छोट्या वाक्यांत आलेले असते. या छोट्या वाक्यरचनेमुळे स्त्रियांना कहाणी ऐकायला, त्यातील आशय व अर्थ समजावून घ्यायला सोईस्कर ठरते.

उदा.– 'ह्या व्रताने दुःख नष्ट होते. दारिद्र्य जाते. चिंता दूर होते. लक्ष्मी घरात येते. शत्रू मित्र होतात. पती घरी येतो. मन शांत होते. कामना पूर्ण होतात.' [३२]

कहाणीतील शद्बवैभव संपन्न असून, तो जो भाव व्यक्त करतात, त्यांनाही मोल प्राप्त होते. म्हणून आशयाच्या दृष्टीने, अभिव्यक्तीच्या दृष्टीने आणि कलात्मकतेच्या दृष्टीने कहाण्यांतील शद्बांत सामर्थ्य असल्याचे आढळते. हे शद्बवैभव डोळ्यांना, कानांना आणि मनाला आनंद देते.

उदा.– 'निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळेरावळे, मनाचा गणेश मनी वसावा.' [३३]

काही कहाण्यांत आवश्यक तेवढाच उल्लेख येतो. तेथे क्रियापदांची गरजच रहात नाही.

उदा. – 'आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता. त्याला सात मुलगे आणि एक मुलगी. त्याच्या बायकोचं नाव धनवंती नि मुलीचं नाव गुणवंती.' [३४]

काही ठिकाणी कमीत कमी शद्बात आकर्षक अशी वाक्यरचना केलेली असते. अगदी मोजक्या शद्बांत एखाद्या ठिकाणचे चित्रण प्रत्यक्षात डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य या कहाण्यांत असल्याचे दिसते.

उदा. – सोमवारच्या शिवामुठीच्या कहाणीत श्रीमंती थाटाचे वर्णन एका विशिष्ट वाक्यात येते. 'देऊळ सुवर्णाचं झालं. रत्नजडिताचे खांब झाले हंड्या गलासं लागली.' [३५] एवढ्याशा तपशीलावरच आपल्याला हुबेहूब असे चित्रण डोळ्यासमोर दिसते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

छोटी वाक्ये आणि प्रासयुक्त रचना यांमुळे ही शैली नेहमीच्या गद्यापेक्षा वेगळी ठरते. सरलता आणि सुश्राव्यता ही तिची वैशिष्टे आहेत. 'आटपाट नगर होतं' एवढीच प्रत्येक कहाणीची सुरुवात. येथे ठराविक स्थलकालाची बंधन सैल करणारा प्रास आढळतो. तसाच कहाणीचा शेवटही ठरलेला, कहाणीची सार्थकता सांगणारा. 'ही सांठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण.' कहाणीत कुठेही अवास्तव वर्णनाचा सोस नाही की, उपदेशाचे अवडंबर नाही. कोण कोणाशी बोलते आहे याचा प्रस्ताव नाही, किंवा उपसंहार आढळत नाही. कित्येक ठिकाणी विशेषणांची खैरात नाही किंवा उपमा अलंकारांचा अवजड सोस नाही. बऱ्याचशा कहाण्यांत क्रियापदेही नाहीत. कोण बोलतेय, कुणाला सांगतेय, हे आपले आपणच समजून घ्यावे लागते. नाट्यपूर्ण कथनाच्या ओघात, संवादाच्या सलगतेमुळे आपणास ते सहज समजतेही.

कहाण्यांमध्ये बोलीचा अकृत्रिम जिवंतपणा आणि तालाचे रमणीय सौंदर्य आढळते. ही शैली म्हणजे गद्यवाङ्मयाचा एक अव्याज मनोहर नमुना म्हणायला हवा. कहाणी सांगणे हे एक प्रकारचे कथननाट्यच आहे असे वाटते. स्त्रियांच्या भावनेला, विचाराला, अनुरूप शद्बांची वर्णरचना, उच्चारातील मृदुत्व, काठीण्य, ताल, लय आणि अर्थ पेलून धरण्याचे सामर्थ्य कहाण्यांतील शद्बात असल्याचे प्रत्ययाला येते. काही ठिकाणी आशयघन शद्बही आढळतात.

उदा.– 'कांकणलेल्या लेकी दे. मुसळकांड्या दासी दे. नारायणासारखे पाच पुत्र दे. दोघी कन्या दे. कुसुंबीच्या फुलासारखे स्थळ दे.'[३६]

ही धरित्रीच्या कहाणीतील आई धरित्रीकडे लेकी मागते. नारायणासारखे पाच पुत्र मागताना दोघी कन्या दे म्हणते आणि त्यांना 'कुसुंबीच्या फुलासारखे स्थळ दे' म्हणून प्रार्थना करते. यातला 'कांकणलेल्या' हा सौभाग्यदर्शक शद्बही आईने लेकी मागताना जाणीवपूर्वक वापरलेला दिसतो. 'कुसुंबीच्या फुलासारखं' ही कल्पना फारच काव्यमय वाटते.

रूळलेल्या भाषिक व्यवहारात कथानकामध्ये मुलेबाळे, लेकीसुना असाच उल्लेख नेहमी येतो. मुलाबाळांनंतरचे स्थान लेकीसुनांना आहे. तरीपण काही संदर्भ आईलेकीतले जिव्हाळ्याचे नाते सांगून जातात. कुठे आई आपल्या व्रताचे पुण्य लेकीला मिळावे असे सांगताना दिसते.

उदा.– मंगळागौरीच्या कहाणीत आईच्या व्रताच्या पुण्याईनेच मुलीचे वैधव्य टळते.[३७]

थोडक्यात कहाण्यांची कथनशैली गीतमय आढळते. छोट्या वाक्यरचनेमुळे कथनशैलीला एक प्रकारचा लय–ताल–नाद प्राप्त झाला आहे. यातील भाषा बोजड नाही. स्त्रियांना समजेल अशी साधी, सोपी, अर्थपूर्ण अशी भाषा आढळते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या स्त्रियांच्या कहाण्यांतील शद्बवैभव अतिशय संपन्न आणि समृद्ध आहे.

कहाण्यांची कथनशैली कशी असते हे आपण पाहिले. आता कहाण्यांतील सांकेतिकता कशी असते ते पाहू.

**इ) कहाण्यांतील सांकेतिकता :–**

या कहाण्यांच्या रचनेमध्ये सांकेतिकता आढळते. तिच्या रचनेची चौकट ठरल्यासारखी असते. सुरूवात आणि शेवट यांत अनेक कहाण्यांमध्ये साम्य आढळते. संकट कोसळणे, त्यावर उपाय सुचविणे, त्याप्रमाणे वर्तन करणे आणि संकटातून मुक्त होणे अशी साधारणपणे कहाणीची रचना असते. कहाणीच्या शेवटी फलश्रुती सांगितलेली असते. कहाणीच्या निवेदनाची जशी एक धाटणी, लकब असते त्याचप्रमाणे त्याच्या रचनेचे एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र असते. प्रारंभ साधा आणि सुटसुटीत असून शेवट सुखांत असतो. परिच्छेदाची रचना कडव्यांसारखी असून त्यात आवर्तन असते.

कहाणी ही व्रतकथा असते. ती सांगितल्याशिवाय किंवा ऐकल्याशिवाय व्रत पूर्ण होत नाही. ती व्रताचाच एक घटक असते. त्यात व्रतासंबंधी तपशील असून त्याची फलश्रुतीही सांगितलेली असते. म्हणजे एकाच वेळी व्रताचा घटक असणे, व्रतासंबंधीचा तपशील देणे, त्याचे महत्त्व सांगणे, त्यांची फलश्रुती सांगणे, ज्या देवतेचे व्रत असेल त्या देवतेचे गुणवर्णन करणे इत्यादी अनेक बाबी कहाणीतील सांकेतिकता दर्शवित असतात. व्रतकथांचा आरंभ आणि शेवट हा सांकेतिक पद्धतीने होतो. व्रतसंबंधित देवतेला आवाहन करून 'आटपाट नगर होतं'असा प्रारंभ केला जातो. तर शेवट 'साठां उत्तरांची कहाणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण' असा केला जातो. व्रतकथेच्या सांकेतिक रचनेचा आराखडा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

आवाहन – स्थलनिर्देश – व्यक्तिनिर्देश – आपत्ती – आपत्तीचे कारण – निरसनाचा उपाय – सहाय्यकर्ता किंवा सहाय्यकर्ती – व्रतपालन – आवर्तन – फलश्रुती –सदिच्छा प्रकटन – कथा समाप्ती.

कहाणीची रचना साचेबंद असून, ती संकेतबद्ध असते. प्रत्येक कहाणीचा एक विशिष्ट साचा ठरलेला आढळतो. कहाणीत काही ना काही तरी सांकेतिकता दर्शविलेली असते. संकटे आल्यानंतर प्रत्येकजण देवाचा धावा करतात. संकटे टाळण्यासाठी, दु:ख दूर होण्यासाठी काही व्रते केली जातात. त्याचप्रमाणे जर एखाद्या व्यक्तीने आपल्या व्रतात खंड पाडला किंवा व्रताचा भंग झाला तर त्याच्यावर संकट येते, हा एक प्रकारचा पिढ्यान्पिढ्या चालत आलेला संकेतच आहे असे वाटते. याशिवाय, पूर्वीच्या काळी लोक राज्याभिषेक करण्याअगोदर राजाची निवड करताना हत्तीसारख्या प्राण्यांना अतिशय महत्त्व देत. हत्ती किंवा हत्तीण यांच्याकडून राजाची निवड केली जाते आणि त्या व्यक्तीला राजा म्हणून लोकमान्यता मिळत, असे कहाण्यांतून दिसून येते.

'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहातील' सांकेतिकता दर्शविणारी अशी काही उदाहरणे पाहू. स्त्रियांच्या कहाण्यात विशेषत: तीन प्रकारची सांकेतिकता आढळते. ती पुढीलप्रमाणे :––

अ) कौटुंबिक – नाते संबंधातील सांकेतिकता :–

कौटुंबिक कारणांमुळे एखादी व्यक्ती व्रत करते. म्हणजेच संतती, संपत्ती, पुत्रप्राप्ती किंवा नावडतेपण संपण्यासाठी, संकटे दूर होण्यासाठी, वैधव्य टळण्यासाठी व्यक्ती विविध व्रते करताना आढळतात. ही एक प्रकारची सांकेतिकता कहाण्यांमध्ये आढळून येते. याचे उदाहरण पुढीलप्रमाणे –

उदा.– बोडणाच्या कहाणीत राजाला दोन सुना होत्या. त्यातील एक आवडती व दुसरी नावडती होती. नावडतीला जेवायला उष्टंमाष्टं, नेसायला फाटकंतुटकं दिलं जात होतं आणि तिला रहायला गुरांचा गोठा दिला जात होता. अशा तिच्या हालअपेष्टा चालू होत्या. मग, ती एक दिवस भक्तिभावानं बोडणाचं व्रत करते आणि तिला देवी प्रसन्न होते. त्यामुळे तिला सुखाचे दिवस येतात. [३८]

या कहाणीतून संकटं, दु:ख आले असता, ती देवीचा धावा करते, व्रत करते आणि देवी तिला प्रसन्न होते असे आढळून येते. म्हणजे संकटे आली असता, लोकांना देवाची आठवण निश्चितच होणार ही सांकेतिकता ठरलेलीच आहे.

ब) देव–भक्त संबंध सांकेतिकता :––

एखाद्या व्यक्तीकडून व्रतात खंड पडला, व्रताची हेळसांड झाली किंवा व्रताचा भंग झाला तर, संबंधित देवतेचा कोप नाहीसा करण्यासाठी व्रते केली जातात. व्रत अखंडपणे केले नाही तर, देवतेचा कोप होणारच ही सांकेतिकता कहाण्यांमध्ये आढळते. याचे उदाहरण पाहू.

उदा.– ललितापंचमीच्या कहाणीतील दोघे ब्राह्मण भाऊ नियमितपणे उपांगललितापंचमीचे व्रत करत असतात. कालांतराने धाकट्या भावाकडून या व्रतात खंड पडतो, व्रताची हेळसांड होते, त्यामुळे त्याच्यावर देवी कोपते आणि सतत त्याच्या आयुष्यात संकटांची मालिका सुरू होते. तो दरिद्री होतो, राज्यभ्रष्ट होतो. मग, मोठा भाऊ त्याला या व्रताची आठवण करून देतो. त्याप्रमाणे तो पुन्हा नेमधर्माने ललितापंचमीचे व्रत करू लागतो आणि सुखीसमाधानी होतो. [३९]

म्हणजेच या कहाणीत ब्राह्मणाकडून व्रताचा भंग झाल्यामुळे संकटे येतात. यातून असे सूचीत होते की, व्रताची हेळसांड झाली किंवा त्यात खंड पडला तर संकटे येणारच. ही सांकेतिकता वर्षानुवर्षे आपल्याकडे चालत आली आहे.

**क) सामाजिक सांकेतिकता :–**

पूर्वीच्या काळी लोक समाजातील काही कल्याणकारक गोष्टींचा निर्णय देण्यासाठी प्राण्यांची किंवा निसर्गातील घटकांची मदत घेत असत. त्यानुसार समाजमान्यतेने काही संकेत ठरविले जात आणि प्राण्यांनी किंवा त्या सांकेतिक गोष्टींनी दिलेला निर्णय सर्वानुमते मान्य केला जात असे. स्त्रियांच्या कहाण्यांतील काही कहाण्यांत असे सामाजिक संकेत किंवा सांकेतिकता आढळून येते. त्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे –

उदा.– बुध–बृहस्पतींच्या कहाणीतील राजाला दारिद्रय येते, त्याचे राज्य नष्ट होते. अशा प्रसंगी त्याचा सातवा मुलगा परगावी कामानिमित्त गेला असता, एका नगरात मुक्काम करतो.

काही दिवसांनी त्या नगराचा राजा मरण पावतो. गादीवर दुसरा राजा बसविल्याशिवाय प्रेत दहन करायचे नाही. अशी त्या गावची पूर्वीपासूनची प्रथा होती. मग, लोक एका हत्तिणीच्या सोंडेत माळ देतात व तिला नगरात सर्वत्र फिरवितात. ज्याच्या गळ्यात ती माळ घालील त्यालाच राज्याभिषेक केला जाईल असा संकेत लोक ठरवितात. ती हत्तीण तीन वेळा या राजाच्या मुलाच्याच गळ्यात माळ घालते आणि त्यालाच राज्याभिषेक करून, राजा बनविले जाते.[४०] म्हणजेच पूर्वी लोक हत्तिणीने केलेल्या निवडीला सर्वमान्यता देत असत असे वाटते. हत्तिणीने राजाची निवड करणे ही सांकेतिकता या वरील कहाणीत आढळते.

थोडक्यात संकटे आल्यावर, दु:ख–कष्ट भोगावे लागल्यानंतर, एखाद्या देवतेचा कोप झाल्यानंतर, संतती, संपत्ती, पुण्य मिळविण्याच्या हेतूने लोक देवाच्या मदतीची अपेक्षा ठेवतात. देवाला प्रसन्न करून घेण्याच्या हेतूने व्रतवैकल्ये करतात. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती नावडती असेल तर ती आवडती होण्यासाठी व्रत करणारच ही एक प्रकारची सांकेतिकता ठरलेली असते. याशिवाय व्रतभंग झाला. व्रताची हेळसांड झाली तर देवतांचा कोप होणार हे ठरलेले असते. त्यामुळे ही सांकेतिक परंपरा वर्षानुवर्षे चालत आलेली दिसते. प्राण्यांमध्ये देवाचे अस्तित्व असते असे मानून हत्तिणीसारख्या प्राण्यांकडून लोकांच्या हिताचे सामाजिक प्रश्न सोडविण्याकरता त्यांची मदत घेणे ही पूर्वीपासून चालत आलेली सांकेतिकता आपणास कहाण्यांतून पहावयास मिळते.

स्त्रियांच्या कहाण्यातील सांकेतिकता हा घटक आपण पाहिला. आता कहाण्यांचा ईहवादी दृष्टिकोन समजावून घेऊ.

### ई) कहाण्यांचा ईहवादी दृष्टिकोन :–

हिंदू धर्मीय जीवनपद्धतीनुसार मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती हेच मानले जाते, त्यासाठी योगाभ्यास, धर्माचे पालन, ईश्वराची भक्ती आवश्यक मानली जाते. मात्र ईश्वराच्या भक्तीचे एक रूप असणाऱ्या या व्रतकथांत माणसाच्या पारलौकिक जीवनाचा किंवा मोक्षाचा उल्लेख कुठेच आढळत नाही. माणसाच्या पारलौकिक जीवनाशी संबंधित असलेल्या अध्यात्म तत्त्वज्ञानाचा किंवा अध्यात्मसाधनेचा धागा कुठल्याच व्रतकथेत गुंफलेला दिसत नाही. परमात्मा, आत्मा, दोन्हींची एकरूपता, या दृश्य जगाचे मायावी स्वरूप यांचाही उल्लेख व्रत कहाण्यांत येत नाही.

याउलट, फक्त आपले लौकिक जीवन सुखी व्हावे, समृद्ध व्हावे एवढी एकच प्रबळ इच्छा व्रतपालनाच्या मुळाशी दिसून येते. स्त्रियांच्या कहाण्यांत जे काही आहे ते सरळ, सुलभ कथनाच्या मार्गाने व्यक्त होताना दिसते. सामान्य माणसाच्या आवाक्यात सहज बसेल, असेच व्रतकथांचे स्वरूप आहे. व्रतकथेतल्या या 'ईहवादी दृष्टिकोनामुळेच व्रतकथांची 'लोकाभिमुखता' टिकून आहे असे मानले जाते. विशेष म्हणजे व्रतकथांतील फक्त सामान्य माणसेच लौकिक सुखासाठी व्रतपालन करतात असे नव्हे तर प्रत्यक्ष जगन्माता समजली जाणारी पार्वती देवी हरितालिकेसारखे व्रत करून इच्छित पती मिळविते. व्रतकथांना असे गृहस्थाश्रम सुखी करण्याचे साधन मानल्यामुळेच सामान्य माणसांची आपुलकी त्याला सहजपणे प्राप्त झालेली असावी.

व्रते करण्यामागे, कहाण्या वाचण्यामागे लोकांनी साध्या अपेक्षा ठेवलेल्या आढळून येतात. गरिबी नाहीशी व्हावी, संकटे दूर व्हावीत, नावडतेपण संपून आवडते व्हावे, अखंड सौभाग्य मिळावे, संतती, संपत्ती लाभावी, पुण्य मिळावे यासाठी व्रते केली जातात. त्याचप्रमाणे भौतिक गोष्टी मिळाव्या, कौटुंबिक सुखप्राप्ती व्हावी, सुखसमाधान लाभावे असे सामान्य व्यक्तींना वाटत असते.

सामान्य व्यक्तींचा ईहवादी दृष्टिकोन तर आहेच. पण, त्यांच्यावर प्रसन्न होणाऱ्या देवदेवतांचा आशीर्वादही ईहवादीच आहे. व्रत करणाऱ्या भक्ताला देवही लौकिक सुख प्राप्त करून देणारेच आशीर्वाद देतात. संतती, संपत्ती लाभणे, संकटे दूर होणे, इच्छित मनोकामना पूर्ण होणे, दुःख, दारिद्र्य नष्ट होणे, वैधव्य टळणे यासारखेच सोपे–सोपे आशीर्वाद दिलेले आढळतात. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

उदा.–१) 'शनिवारची मारूतीची कहाणी' या कहाणीत सून एका अनोळखी मुलाला न्हाऊमाखू घालते. जेवायला देते. त्यामुळे त्यांची गरिबी दूर होते. घराचे रूपांतर वाड्यात होते. गुरेढोरे, धनधान्य, नोकरचाकर यांनी घर भरते आणि त्यांना समृद्धी येते. [४१]

२) सोमवारच्या शिवामुठीच्या कहाणीत, राजाची सून चारही सोमवारी शिवामूठ वाहते. मनोभावे प्रार्थना करते, हे व्रत अखंडपणे करते. त्यामुळे शंकर तिला प्रसन्न होतात आणि तिचे नावडतेपण संपून ती सर्वांची आवडती होते. [४२]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

३) वैभवलक्ष्मीच्या कहाणीतील स्त्री भक्तिभावाने वैभवलक्ष्मीचे व्रत करते. या व्रताच्या प्रभावामुळे तिची संकटे दूर होतात. दु:ख-दारिद्र्य संपून, तिला संतती, संपत्ती, सुखसमाधान मिळते. [४३]

थोडक्यात लौकिक सुखाची आशा या व्रतकथांतून प्रकट होत असली तरी हा लौकिक सुखप्राप्तीचा मार्ग परमेश्वर-भक्तीच्या आणि सदाचरणाच्या मार्गाशी एकरूप झालेला आहे किंबहुना, लौकिक सुखाची इच्छा आणि भक्तिभावना यांचा मनोज्ञ संगम या कथांच्या आधारे साधला जातो. व्रतपालनातून जगत्नियंत्या ईश्वराचे स्मरण सतत होत राहते, संकटमुक्त जीवनाची आशा मनात सतत जागृत राहते. संकटे प्रत्यक्षात येऊन उभी राहिली तरी त्यांना तोंड देण्याचे धैर्य मिळते. हाच ईहवादी दृष्टिकोन प्रत्येक कहाणीतून आढळतो.

याशिवाय आज लोक श्रीमंत होऊ पाहतात. पण, वाईट मार्गाकडे त्यांचा कल असतो. चोऱ्या, दरोडे, भ्रष्टाचार, खून अशा वाईट मार्गातून त्यांना पैसे कमवायचे असतात. याउलट, सुयोग्य भक्ती करून, सामान्य लोक परमेश्वराला प्रसन्न करून घेतात आणि त्याच्याकडून संतती, संपत्ती, ऐहिक सुखसमाधान प्राप्त करून घेतात हाच त्यांचा ईहवादी दृष्टिकोन या कहाण्यांतून मनाला आनंद देतो.

कहाण्यांचा ईहवादी दृष्टिकोन आपण पाहिला. आता कहाण्यातील नीतीची शिकवण हा घटक पाहू.

**उ) कहाण्यातील नीतीची शिकवण -**

आज एकविसाव्या शतकात जिकडेतिकडे मूल्यहीन जीवनमान आढळते. या विज्ञानयुगात भौतिक सुखे मिळतात. पण, त्यामुळे सर्वत्र चंगळवाद वाढलेला दिसतो. प्रेम, आपुलकी, सहानुभूती यांची जागा रागद्वेष, भांडणतंटा यांनी घेतलेली आढळते. नैतिकता, साधेपणा, सामाजिक ऐक्य या मूल्यांचे संस्कार करण्याची वेळ आज आपल्यावर आलेली आहे. मुलांवर लहानपणापासूनच चांगले संस्कार करायला कोणाला वेळ नसतो. त्यांच्या बालमनावर नैतिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, बंधुभाव, चांगले आचरण इत्यादी बिंबविण्याचे काम लहान वयातच केले जावे. अशी नीतीमूल्ये, संस्कार

आपणाला कहाण्यांतून मिळतात. कहाण्या आपल्याला नीतीची शिकवण देतात म्हणून कहाण्यांतील नीतीची शिकवण समाजमनावर बिंबित करण्यासाठी या घटकांचा अभ्यास करावा वाटला.

'सचित्र व सुबोध' कहाणीसंग्रहातील प्रत्येक कहाणीतून काहीना काहीतरी शिकवण मिळते. व्रतकथा या नीतिवादी बोधकथा असल्यामुळे कहाण्यांतून नैतिकमूल्ये, शाश्वतमूल्ये यांचे संस्कार व्यक्तीवर घडत असतात. माणुसकीहीन कर्मकांडाचा कहाण्यांत निषेध केल्याचे दिसून येते. माणसाची प्रेमाने वागणाऱ्याचीच भक्ती देवाला आवडते असे कहाण्या सांगतात. कहाणीत चमत्कार आहेत, व्रताची पद्धत आहे, मनोभावे पूजा करण्याचे आवाहन आहे; पण या सर्वांत भोवतालच्या माणसांना दु:ख न देण्याचा आदेश आहे. कहाण्यांतील भक्तिमार्ग हा सर्वांचे हित चिंतणारा, कल्याण साधणारा आहे. पुराणकालापासून प्रचलित असलेल्या या व्रतकथा आजपर्यंत अखंडितपणे टिकून आहेत. या व्रतकहाण्यांना धार्मिकतेची जोड दिलेली आढळते, एकमेकांशी नीतीने, सदाचाराने वागावे हा भारतीय धर्माचा पाया आहे. याला अनुसरूनच कहाण्यांत मूल्यांची उपासना केलेली दिसते. अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

स्त्रियांच्या कहाण्यांतून पर्यावरणाचे मूल्य शिकविले जाते. या कहाण्यांमध्ये धरित्रीमाता, सूर्यदेवता, जलदेवता यांची तसेच नाग, गाईवासरे, बैल असे प्राणी व वडासारखे दीर्घायुषी वृक्ष यांची पूजा केलेली आढळते. स्त्रियांच्या कहाण्यातील अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

उदा.– १) धरित्रीच्या कहाणीत, धरित्रीमातेला पूज्य मानून तिचे नित्यनेमाने पूजन करण्यास सांगितले आहे. [४४]

२) सोमवारच्या खुलभर दुधाच्या कहाणीत, म्हातारी मुलाबाळांना, गाईवासरांना दूध ठेवून उरलेले दूध देवाला वाहते. त्याक्षणीच देवाचा गाभारा भरून जातो. यावरून, आपणांस अशी नीतीची शिकवण मिळते की, 'जो माणूस आपल्या माणसांचा सांभाळ नीट रीतीने करून, देवाची पूजा करतो, तोच देवाला आवडतो.' [४५]

३) शनिवारच्या मारूतीच्या कहाणीत ब्राह्मणाची सून दारी आलेल्या एका मुलाला न्हाऊमाखू घालून, जेवायला वाढते. आणि उरलेसुरले आपण खाते. म्हणजेच 'मनुष्य अगदी गरीब

असला तरी त्याने आपल्या हातून होईल तेवढा परोपकार करावा. त्या परोपकाराचे फळ त्याला मिळतेच.' ही नीतीची शिकवण आपणाला या कहाणीतून मिळते. [४६]

याशिवाय आपण कोणाचे चांगले केले तर तर ते फुकट न जाता त्याचे फळ नक्की मिळते, देवभक्ताचा पाठीराखा असतो, कितीही दुष्ट प्राणी असला आणि त्याची जर आपण मनोभावे चांगली आराधना केली, तर तो संतुष्ट झाल्यावाचून रहाणार नाही, दारात कोणी काही मागण्यास आला तर त्याला रिकाम्या हाताने परत न पाठवता संतुष्ट करावे, किंवा जो सद्धर्माने वागतो, सत्कर्म करण्यात आपले आयुष्य घालवितो त्याला अखेर देव भेटल्याशिवाय राहात नाही अशा प्रकारची नीतीतत्त्वे, नीतीची शिकवण आपणास कहाण्यांतून मिळते. आजच्या विज्ञानयुगात माणसाचे जीवन सुखकर झालेले असले तरी जीवनातील असुरक्षिततेची भावना माणसाच्या ठिकाणी पहावयास मिळते. या भीतीपोटीच माणसाच्या मनात श्रद्धा निर्माण होते. माणसातील परस्पर राग–द्वेष मिटण्याकरता, प्रेमाची भावना जोपासण्याकरता, सामाजिक ऐक्य वाढविण्याकरता नीतीमूल्यांची उपासना करणे आवश्यक ठरते. अशी नीतीमूल्ये आणि जीवनमूल्ये आपणास या व्रतकहाण्यांतून मिळतात.

स्त्रियांच्या कहाण्यांतून नीतीची शिकवण कशी मिळते हे आपण पाहिले. आता स्त्रियांच्या कहाण्यांतून होणारी पुनरावृत्ती हा घटक आपण पाहू.

**ऊ) कहाण्यातील पुनरावृत्ती :–**

व्रतकथांच्या रचनेत किंवा कहाण्यांमध्ये पुनरावर्तनाचे ठळक वैशिष्ट्ये दिसून येते. गेयसदृश वाक्यरचना आणि पुरावर्तन यांच्यामुळे काव्यात ज्याप्रमाणे कडवी असतात अगदी त्याप्रमाणेच व्रतकहाण्यांची रचना असते. व्रतकथा ही मुखोद्‌गत म्हणावयाची अपेक्षा असल्याने आणि मौखिक परंपरेने ती प्रचलित राहात असल्यामुळे कहाण्यांमध्ये पुनरावर्तनाची मदत होत असावी असे वाटते. कहाणीमध्ये अनेक वाक्यांची, शद्बांची पुनरावृत्ती केलेली असते. धृवपदामध्ये वाक्ये घोळवलेली असतात. त्यामुळे कहाणीतील भाषेला एक प्रकारची नादमयता प्राप्त होते. वाक्यांच्या पुनरावृत्तीने छोटी गेयपूर्ण वाक्ये कर्णमधुर वाटतातं. त्यामुळे कहाण्यांचे स्वरूप आकर्षक वाटावे असे असते. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :–

उदा.–१) शनिवारच्या मारूतीच्या कहाणीत, 'बाई बाई मला न्हाऊ घाल, माखू घाल'या वाक्याची आणि 'बाई'या शब्दाची दोनदा पुनरावृत्ती झाली आहे. त्यामुळे या शद्बामुळे वाक्याची रचना आपल्याला आकर्षून घेते, मोहून टाकते. [४७]

२) आदित्यराणूबाईच्या कहाणीत, 'अग अग दासींनो, तुम्ही दासी कोणाच्या? आम्ही दासी प्रधानाच्या. प्रधानाच्या राणीला जाऊन सांगा, तुमच्या बहिणीचा मुलगा आला आहे. कसा आला आहे ? काय आला आहे ? फाटकं नेसला आहे, तुटकं पांघरला आहे. तळ्याच्या पाळीला उभा राहिला आहे. परसदारानं घेऊन या.' याचप्रमाणे परसदारानं घेऊन आल्या. न्हाऊमाखू घातलं. पीतांबर नेसायला दिला. जेऊ खाऊ घातलं.

३) 'बाबा, ठेवू नको, विसरू नको, घरी जतन करून घेऊन जा.' या वाक्यांची चार वेळा पुनरावृत्ती झाली आहे. यातील वाक्यांना एक प्रकारची लय आहे, ताल आहे, एक प्रकारची नादमयता वाक्यांना प्राप्त झाल्यामुळे ही वाक्ये ऐकायला गोड वाटतात. याशिवाय, 'करा रे हांकारा, पिटा रे डांगोरा. नगरात कोणी उपाशी आहे कां ?' आणि 'उपाशी नाही, तापाशी नाही.' असा त्याचा प्रतिसाद आदित्यराणूबाईच्या कहाणीत चार वेळा पुनरावृत्त होतो. [४८] त्यामुळे कहाणीला तालबद्ध लय पूरक ठरते. छोटी वाक्ये, शद्बांची आणि वर्णनाची पुनरावृत्ती कहाणीला श्रवणीय ठेका प्राप्त करून देतात. याशिवाय पुनरावृत्त होणाऱ्या वाक्यांनी कथनाला अखंडितता आणि लय प्राप्त होते. त्यामुळे वाक्याची रचना आकर्षक मनमोहक अशी झालेली आढळते. अशा तऱ्हेने कहाण्यांमध्ये पुनरावृत्ती होताना दिसते. कहाण्यात आढळणाऱ्या पुनरावृत्तीची काही उदाहरणे आपण पाहिली. आता या कहाण्यांमध्ये अद्‌भूतताही आढळते ती कशी ते पाहू.

## ए) कहाण्यातील अद्‌भूतता :-

अद्‌भूतता म्हणजे चमत्कार, आज एकविसाव्या शतकात आपणास ही अद्‌भूतता पहावयास मिळत नाही. चमत्कारांमध्ये कुतूहल जागृती उत्कटपणे केलेली असते. याशिवाय कृती, घटना व प्रसंग यांच्याद्वारे व्यक्तीच्या शक्तीबाहेरील गोष्टी घडल्याचे अद्‌भूत प्रसंगांतून दिसून येते. अद्‌भूतता हा लोकजीवनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. संत ज्ञानेश्वरांनी एका रेड्याच्या तोंडून वेद म्हणवून घेतले, भिंत चालवून दाखविली हा केवढा मोठा चमत्कार होता. याप्रमाणेच साईबाबांनी

पणतीत पाणी घालून दिवे लावले होते. आजच्या वास्तविक जीवनात असे चमत्कार, अद्भूतता कोठेही आपणास आढळत नाही. अशा केवळ कल्पनाच करणे आपणास योग्य वाटते. या विज्ञानयुगात आपला अशा चमत्कारांवर विश्वासच बसत नाही. पण, तरीही अद्भूततेचे, चमत्कारांचे जग हे आपणाला आकर्षित करीत असते. अशी अद्भूतता आपल्याला आवडते, मोह घालते आणि आपणाला ती हवी असते.

'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहातील' कहाण्यांत ठिकठिकाणी अद्भूतता किंवा चमत्कार आढळतात. कहाण्यांतील अद्भूतरम्य वातावरणामुळे कहाणीचे आकर्षण वाढत असते. जणूकाही त्यातील अद्भूतता आपणास साद घालीत आहे असे वाटते. अद्भूततेनी भरलेले एक वेगळे विश्व या कहाण्यांमधून उभे राहते. वेगवेगळे चमत्कारिक प्रसंग, घटना, व्यक्ती पात्रे आपल्या डोळ्यासमोर हुबेहुब चित्रीत होतात आणि आपण कहाण्या वाचण्यात किंवा ऐकण्यात मग्न होऊन जातो. स्त्रियांच्या कहाण्यांतील अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :-

उदा.- १) सोमवारच्या खुलभर दुधाच्या कहाणीत एक म्हातारी बाई आपल्या घरातील मुलाबाळांना, गाईवासरांना दूध ठेवून, उरलेले खुलभर (वाटीभर) दूध घेऊन देवळात जाते. मनोभावे देवाची पूजा करून थोडेसे दूध नैवेद्याला ठेवते आणि राहिलेले दूध गाभाऱ्यात ओतते. ती घरी आल्यानंतर एक चमत्कार घडतो देवाचा गाभारा दुधाने भरून जातो. [४९]

राजा गावातील सगळे दूध गाभाऱ्यात ओततो तरी गाभारा भरत नाही आणि म्हातारीच्या या खुलभर दुधाने देवाचा गाभारा भरून जातो; ही प्रत्यक्ष जीवनात नुसती कल्पनाच केलेली बरी. आज या गोष्टीवर कोणाचाच विश्वास बसणार नाही. पण, खरोखरच या कहाणीत असा चमत्कारिक प्रसंग घडलेला आहे.

२) सोमवारच्या शिवामुठीच्या कहाणीत, राजाची सून रानावनात जाऊन महादेवाची पूजा करते. एक दिवस घरातील सर्वजण तिला तिचा देव दाखविण्यास सांगतात. तेव्हा ती काट्याकुट्यातून रानात जाते. देवाची प्रार्थना करते आणि पाहते तर आपोआपच एक सोन्याचे देऊळ प्रकट होते. रत्नजडिताचे खांब होतात, हंड्याझुंबरे येतात. स्वयंभू महादेवाची पिंड तयार होते. मग सर्वजण देवाचे दर्शन घेतात आणि थोड्या वेळाने देऊळ अदृश्य होते. [५०]

या कहाणीतील हे अद्‌भूतरम्य वातावरण आपणाला एका वेगळ्याच सृष्टीत घेऊन जाते. कारण, आज जो तो आपल्यापरीने देवाची भक्ती करतो. पण, त्याच्या भक्तीने कधी देव प्रसन्न होऊन दर्शन देत नाहीत किंवा स्वयंभू एखादे दैवतही प्रकट होत नसते. त्यामुळे अशा चमत्कारांकडे आपण आकर्षिले जातो.

३) नागपंचमीच्या कहाणीत एका ब्राह्मणाला पाच सुना होत्या. त्यापैकी चार सुना आपल्या माहेरी, आजोळी, पणजोळी जातात. तेव्हा धाकटी सून दुःखी होते. कारण, तिला आपले जवळच असे कोणीच नसते. मग, मनात ती नागोबाला आपला सगासोयरा मानून तो आपल्याला माहेराहून न्यावयास येईल अशी आशा बाळगते. तिचे दुःख पाहून शेषभगवानास तिची दया येते. मग, तो ब्राह्मणाचा वेष घेऊन, मुलीचा मामा या नात्याने तिला माहेरी घेऊन जाण्यास येतो. वाटेत जाताना तो तिला खरी हकीकत सांगतो आणि आपल्या फणीवर बसवून आपल्या नागलोकात घेऊन जातो. [५१]

वास्तविक जीवनात सापासारखे प्राणी पाहून आपण घाबरून जातो. मग, त्याच्या फणीवर बसून, त्याच्या नागलोकात जाणे ही तर दूरचीच गोष्ट. पण, या कहाणीत तसे घडते. ती मुलगीही न घाबरता सापाबरोबर त्याच्या नागलोकात जाते. तिथे काही दिवस राहते आणि विशेष म्हणजे नागिणीचे बाळंतपण ती स्वतः करते. आणि काही दिवसांनी सुखरूप आपल्या घरी परत येते.

या कहाणीत कमालीचे धाडस आणि अचंबित करणारी अद्‌भूतता आपणास आढळते. एखाद्या बाईचे, गाई–म्हशींचे बाळंतपण करणे सोपे असते पण, नागिणीसारख्या प्राण्याचे बाळंतपण करणे हा चमत्कार आपल्याला नवीनच कधी न ऐकलेला, असा विचार करण्यास भाग पाडतो.

याशिवाय दिव्यशक्तीच्या आधारे कहाण्यातील व्यक्ती समुद्र पार करतात. उष्टी ताटे रत्नजडितांनी भरून जातात, मेलेली माणसे जिवंत होतात. सूर्यनारायण कधी माळ्याच्या, गुराख्याच्या, घारीच्या रूपात आलेला आढळतो. या गोष्टी आपणाला नव्यानेच समजतात. त्यामुळे आपली त्याबद्दलची कुतूहलता अधिकच वाढते. आपण कहाण्यांकडे आकर्षिले जातो. या कहाण्या आपले मन मोहून टाकतात. एका कल्पनारम्य सृष्टीत घेऊन जाण्याचे काम कहाण्या करत असतात. म्हणून असे वाटते की, या कहाण्यांत अद्‌भूतताच नसेल तर नवल !



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

थोडक्यात कहाणीच्या आटपाट नगरीत जे घडते आणि ते ज्या माणसांच्या बाबतीत घडते, ते सर्व कल्पिताच्या रंगांनी रंगलेले असते. कहाणी जणू आपल्या जगावरून 'कुसुंब्याचा गुलजार हात' फिरविते. हेमंत ऋतुतील पहाटेचे हलके, मुलायम धुके परिचित दृश्यांनाच एक अद्‌भूत रूप बहाल करीत असते. कहाणी कल्पिताचा तेवढाच आणि तसाच हलका व मुलायम वापर करून वास्तवाला खास तिचा असा घाट देत असते. त्यामुळेच आपल्याला कहाण्यांत अद्‌भूत चमत्कारिक दृश्ये पाहावयास मिळतात. चमत्कारांमध्ये कृती, घटना व प्रसंग यांच्याद्वारे व्यक्तीच्या शक्तीबाहेरील गोष्टी घडल्याचे दर्शविलेले आहे. यामध्ये नशीब, दैव यांचा बराच प्रभाव दिसतो. प्राणी, पक्षी, दैवीशक्ती, यक्ष, पिशाच्च, देवदूत इत्यादी नायक-नायिका कहाण्यांतील व्यक्तीना संकटकाळी मदत करताना दिसतात. हे नायक-नायिका सुंदर, पराक्रमी आणि कर्तबगार असतात. या कहाण्यांतील अद्‌भूततेतून किंवा चमत्कारांतून मनोरंजन केलेले आढळते.

स्त्रियांच्या कहाण्यात आढळणाऱ्या अद्‌भूततेची काही उदाहरणे आपण पाहिली. आता कहाण्यातील वस्तुमात्रांवर मानवी आरोपण कसे केले जाते ते पाहू.

**ऐ) वस्तुमात्रांवर मानवी आरोपण :-**

'सचित्र सुबोध कहाण्यासंग्रहातील' काही कहाण्यांत वस्तुमात्रांवर मानवी आरोपण केल्याचे आढळते. या कहाण्यांमधील प्राणी, वस्तू मानवासारख्या बोलतात, त्यांच्या भावभावनादेखील मानवासारख्याच असतात असे दिसते. मानवाप्रमाणेच त्यांच्यातही दु:ख, राग, द्वेष, प्रेम, आपुलकी, सूड भावना व्यक्त होताना दिसतात. या कहाण्यांमध्ये कधी नाग बोलतो तर कधी दिवे बोलू लागतात. कधी बैल व कुत्री यांच्यातील संभाषण आढळते. हे प्राणी मानवासारखेच बोलतात, वागतात आणि विशेष म्हणजे मानवालासुद्धा त्यांची भाषा, त्यांचे बोलणे समजते. स्त्रियांच्या कहाण्यातील अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे -

१) मानवी संभाषण कलेचे आरोपण :-

भाषाशास्त्र असे मानते की बोलण्याची कला फक्त मानवाला अवगत आहे. मात्र, स्त्रियांच्या या कहाण्यांमध्ये मानवेतर प्राणीसुद्धा बोलतात इतकेच नव्हे तर दिव्यांच्यासारख्या

वस्तूही बोलतात. यांचे आणखी एक विशेष म्हणजे ही भाषा माणसांनासुद्धा कळते. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :-

उदा.- १) दिव्यांच्या अवसेच्या कहाणीत गावातील सर्व दिवे एकमेकांशी गप्पागोष्टी करताना आढळतात. याशिवाय राजाच्या घरचा दिवा सांगतो, 'बाबांनो, काय सांगू ? यंदा माझ्यासारखा हतभागी कोणी नाही. मी दरवर्षी सर्व दिव्यांत मुख्य असायचो. यंदा मला विपत्तीत दिवस काढावे लागत आहेत.' [५२] या कहाणीत, दिवा मानवाप्रमाणे बोलतो, ते आपणांस समजते.

२) ऋषिपंचमीच्या कहाणीत बैल व कुत्री या प्राण्यांच्यातील संवाद आला आहे. कुत्री बैलाजवळ जाऊन रडते. तेव्हा बैल तिला रडण्याचे कारण विचारतो. ती सांगते, 'मी आज उपाशी आहे. खिरीच्या पातेल्यात सापाने गरळ टाकलेली मी पाहिली. ते अन्न खाऊन, ब्राह्मण मरतील म्हणून मी पातेल्याला तोंड लावले. म्हणून सुनेने जळते कोलीत घेऊन माझी कंबर मोडली.' तिला बैल म्हणतो, 'तू आदल्या जन्मी विटाळ घरात कालविलास, त्याचा संपर्क मला झाला. त्या दोषानं मी बैल झालो. आज माझ्या मुलानं मला नांगराला धरलं, तोंड बांधू मारलं, मी देखील आज उपाशीच आहे. त्याचं श्राद्ध फुकट गेलं.' हे संभाषण मुलगा ऐकतो. मग, बैलाला चारा घालतो. कुत्रीला अन्न देतो आणि दोघांना चांगले पाणी प्यायला देतो. मनात फार दु:खी होतो.[५३]

नाग-नागीण, चिमणा-चिमणी, गाई-म्हशी असे प्राणी बोलतात पण, बैल आणि कुत्री अशा भिन्न जातीतील प्राणी सुद्धा एकमेकांशी बोलतात आणि त्यांना एकमेकांची भाषा कळतेही शिवाय बैल आणि कुत्री यांच्यातील संभाषण मानवाला कळतेसुद्धा हे इथे आपणाला नव्यानेच उमगते.

२) मानवी भावनांचे आरोपण :-

सुख-दु:ख, राग-द्वेष, प्रेम, सहानुभूती, बंधुभाव, सूड घेण्याची प्रवृत्ती या सर्व मानवी भावना आहेत. त्या भावना प्राण्यांच्यामध्ये आहेत का? असा प्रश्न पडतो. पण, स्त्रियांच्या कहाण्यांमध्ये मात्र प्राण्यांच्यामध्ये मानवी भावभावनांचे आरोपण केलेले दिसते. याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :-

उदा.–१) नागपंचमीच्या कहाणीत, भीतीने घाबरून मुलीच्या हातातील दिवा नागिणीच्या पिल्लांच्या शेपटावर पडतो. त्यामुळे पिल्लांची शेपटे भाजतात. पुढे मोठेपणी पिल्ले नागिणीकडे शेपटांबद्दल चौकशी करतात. तेव्हा, नागीण त्यांना मुलीची हकीकत सांगते. मग, पिल्लांना मुलीचा खूप राग येतो आणि ती मुलीचा सूड घेण्याचा विचार करतात. [५४]

मानवाप्रमाणेच नागिणीच्या पिल्लांच्या मनात सूड घेण्याची प्रवृत्ती निर्माण झालेली आपणास आढळते.

२) दिव्यांच्या अवसेच्या कहाणीत, राजाची सून घरातला पदार्थ स्वत: खाते आणि त्याचा आळ उंदरांवरती घेते. तेव्हा उंदीर तिचा सूड घेण्याच्या उद्देशाने रात्रीच्या वेळी तिची चोळी पाहुण्याच्या अंथरूणात नेऊन टाकतात. [५५] मानवी जीवनातसुद्धा असाच प्रकार घडत असतो. राग–द्वेषाच्या कारणातून मानवाला सूड घेण्याची वृत्ती निर्माण होते, तशीच सूडाची भावना या कहाणीतील उंदरांच्या मनात निर्माण झालेली आढळते.

थोडक्यात लोककथा आपण पाहिल्या तर त्या कल्पनेने भरलेल्या दिसतात. त्यातील कथांत चमत्कार, अद्‌भूत घटना आपणास आढळतात. व्रत–कहाण्या या लोककथांचा एक महत्त्वाचा भाग असल्याने आपला या कहाण्यांतील अद्‌भूततेवर, चमत्कारांवर विश्वास बसतो आणि आपण या कहाण्यांकडे आपोआपच आकर्षिले जातो असे वाटते.

या प्रस्तुत प्रकरणात आपण कहाण्यांची भाषाशैली कशी असते ती पाहिली, कहाण्यांची मांडणी समजावून घेतली, कहाण्यांतील संवाद पाहिले, कहाण्यांच्या कथनशैलीवर चर्चा केली, कहाण्यांतील सांकेतिकतेचे रूप पाहिले, कहाण्यांचा ईहवादी दृष्टिकोन हा घटक पाहिला, त्याचप्रमाणे कहाण्यांतील नीतीची शिकवण हा महत्त्वाचा भाग पाहिला, तसेच कहाण्यांत होणारी पुनरावृत्ती पाहिली, कहाण्यांतील अद्‌भूततेची काही उदाहरणे समजावून घेतली आणि शेवटी कहाण्यांतील वस्तुमात्रांवर मानवी आरोपण कसे केले जाते ते पाहिले. स्त्रियांच्या कहाण्यांच्या रूपबंधाचा हा अभ्यास विशेष महत्त्वाचा आणि आनंददायी वाटला.

*****

## संदर्भ सूची


१) कोळेकर वैदेही, 'मराठी लोककथा : स्वरूप मीमांसा', सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती –१९८७, पृष्ठ क्रमांक – १५८.

२) रायकर सुधाताई – संपादक, 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह', रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, नवीन आवृत्ती – २००९, पृष्ठ क्रमांक –१७.

३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ६५.

४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ५९.

५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ९१.

६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २१.

७) ढेरे अरूणा, 'लोकसंस्कृतीची रंगरूपे', मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती–१९९०, पृष्ठ क्रमांक –२.

८) रायकर सुधाताई – संपादक, 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह', रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, नवीन आवृत्ती – २००९, पृष्ठ क्रमांक – ३.

९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ४६.

१०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १०.

११) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३९

१२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ६५.

१३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १७.

१४) कुलकर्णी दा. वि., 'मराठी कथा : स्वरूप आणि आस्वाद', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्रथम आवत्ती–१९७६, पृष्ठ क्रमांक – ६९.

१५) रायकर सुधाताई – संपादक, 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह', रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, नवीन आवृत्ती – २००९, पृष्ठ क्रमांक –३.

१६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ८.

१७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २९.

१८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २५.

१९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १७.

२०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १९.

२१) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २१.

२२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३९.

२३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३७.

२४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १०.

२५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १९

२६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ४६.

२७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ९०.

२८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ८.

२९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २५.

३०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ५६.

३१) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १९.

३२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ९१.

३३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३.

३४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ८१.

३५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २१.

३६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ७.

३७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३३.

३८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ८८.

३९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ६१.

४०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ३७.

४१) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ४६.

४२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २१.

४३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ९७.

४४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ०७.

४५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १७.

४६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ४६.

४७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ४६.

४८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १०.

४९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – १७.

५०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २१.

५१) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २५.

५२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ०८.

५३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ५६.

५४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – २५.

५५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक – ०८.

*****